ISSN 2278-5914

# सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

(संस्था नोंदणी क्र. महाराष्ट्र / १३४८२ / सातारा/२०१०)


## तिसरे राज्यस्तरीय अधिवेशन - २०१२

### शोधनिबंध संग्रह

# संशोधन

SANSHODHAN

यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष - १२ मार्च २०१२ ते ११ मार्च २०१३



सुसंस्कारित मराठी नेता
महाराष्ट्राचे शिल्पकार
सह्याद्रीचा मानबिंदू
हिमालयाचा रक्षणकर्ता
सभ्यता आणि नम्रतेचा पाईक
विकेंद्रित सत्तेचा प्रणेता
संवेदनशील व सुसंस्कारित नेता
सामाजिक न्यायाचा कैवारी
कृषी-औद्योगिक क्रांतीचा प्रणेता
माणसे जोडणारा माणूस...

ISSN 2278-5914

शोधनिबंध संग्रह

# संशोधन

# SANSHODHAN

e.mail id : sism@rediffmail.com


## प्रमुख संपादक

प्रा. विश्वनाथ पवार

## संपादक मंडळ

प्रा.डॉ.विनायकराव जाधव

प्रा.राजेंद्र देशमुख

प्रा.डॉ.सुखदेव शिंदे

प्रा.अजितकुमार जाधव

प्रा.जयपाल सावंत

प्रा.डॉ.सुमित यादव

ISSN 2278-5914

तिसरे राज्यस्तरीय अधिवेशन-कराड (२०१२)

शोधनिबंध संग्रह

# संशोधन

**प्रकाशक :**

प्राचार्य डॉ. विजयराव नलावडे

अध्यक्ष, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.

प्लॉट नं. ९, गुरुदत्त कॉलनी, संगमनगर, सातारा.

फोन : (कार्या.) ०२१६२/२४७३४८. मोबा.: ९४२११२०६०२

**संपादक :**

प्रा. विश्वनाथ पवार,

खजिनदार, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.

मोबा.: ८६९८९०९७०७, ७७९८१२२०२६

**मुद्रक :**

सिद्धीविनायक एन्टरप्राइझेस,

३२२, यादोगोपाळ पेठ, सातारा.

मोबा. : ९४२०७७१३२६

**अंक तिसरा, प्रथम आवृती:**

१३ ऑक्टोबर, २०१३ (विजयादशमी)

**देणगी मूल्य : रु. २००/-**

@ सर्व हक्क सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा यांच्या स्वाधीन

('संशोधन' या शोधनिबंध संग्रहातील प्रकाशित झालेल्या शोधनिबंधातील मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही. ती मते त्या त्या संशोधकांची समजावीत.)

ISSN 2278-5914

तिसरे राज्यस्तरीय अधिवेशन-कराड (२०१२)

शोधनिबंध संग्रह

# संशोधन

**प्रकाशक :**

प्राचार्य डॉ. विजयराव नलावडे
अध्यक्ष, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.
प्लॉट नं. ९, गुरुदत्त कॉलनी, संगमनगर, सातारा.
फोन : (कार्या.) ०२१६२/२४७३४८. मोबा.: ९४२११२०६०२

**संपादक :**

प्रा. विश्वनाथ पवार,
खजिनदार, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.
मोबा.: ८६९८९०९७०७, ७७९८१२२०२६

**मुद्रक :**

सिद्धीविनायक एन्टरप्राइझेस,
३२२, यादोगोपाळ पेठ, सातारा.
मोबा. : ९४२०७७१३२६

**अंक तिसरा, प्रथम आवृती:**
१३ ऑक्टोबर, २०१३ (विजयादशमी)
देणगी मूल्य : रु. २००/-

@ सर्व हक्क सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा यांच्या स्वाधीन
('संशोधन' या शोधनिबंध संग्रहातील प्रकाशित झालेल्या शोधनिबंधातील मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही. ती मते त्या त्या संशोधकांची समजावीत.)

## यशवंतराव चव्हाण व महाराष्ट्र : राजकीय कार्य


१२. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय नेतृत्वाचा उदय
– प्रा.डॉ. सुमित संभाजी यादव ५३

१३. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण
– प्राचार्य डॉ. दीपक गोविंद देशपांडे
– प्रा.डॉ. गौतम नामदेव ढाले ५८

१४. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान
– प्रा. व्ही. के. मोरे ६३

१५. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण
– प्रा. उर्मिला न. क्षीरसागर ६८

१६. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण
– प्रा.विकास येलमार ७२

१७. यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय नेतृत्व व योगदान
– बाळासाहेब माणिकराव टकले
– महेंद्रं पांडुरंग पवार ७७

१८. आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाणांचे योगदान
– प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम ८१


## यशवंतराव चव्हाण : शैक्षणिक कार्य


१९. यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक योगदान
– प्रा. अनिल कोकाटे ८६

२०. यशवंतराव चव्हाणांच्या योगदानातून साकारलेला शैक्षणिक महाराष्ट्र
– प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते ९०

२१.यशवंतराव चव्हाण : सर्वांगिण शिक्षणाचा प्रणेता
– प्रा. श्रीकांत शंकर उपलंचवार ९८

२२.यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार
– प्रा. संजीव सुखलाल बोडखे १०४

२३. यशवंतराव यांचे दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळास योगदान
– प्रा. मनोहर सुबराव कोळसेकर १०८

२४.यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील योगदान
– प्रा. डॉ. सौ. मेघना दीपक उदगावकर १११

ा ताब्यात घेऊन त्यांच्या बंदुका पळविल्या ...
शवंतरावांच्या या धडाडीच्या कार्यामुळे ते ब्रिटिश सरकारच्या नजरेत आले. भूमिगत यशवंतरावांना ...
साठी ब्रिटिश सरकार डिसेंबर १९४२ पासून प्रयत्न करत होते त्या साठी सरकारने यशवंतरावांना ...
प १००० रू.चे बक्षिस जाहिर केले होते पण यश येत नव्हते. त्यांचा ठाव ठिकाणा सांगावा म्हणून ...
कुटूंबियांना त्रास द्यायला सुरूवात केली. यशवंतरावांचे मधले भाऊ गणपतराव यांना पकडून ...
पाठविले. १५ जानेवारी १९४२ रोजी सौ.वेणूताई यांना अटक केली. परंतु वेणूताईंची प्रकृती ...
ची मुक्तता करण्यात आली व त्यांना माहेरी फलटणला पाठविण्यात आले. वेणूताईंची प्रकृती ...
ल्यामुळे यशवंतराव त्यांना भेटण्यासाठी फलटणला गेले आणि तेथेच १७ मे १९४३ रोजी त्यांना ...
आले. यशवंतरावांना त्यांच्या कार्याबद्दल सहा महिन्याची शिक्षा देण्यात आली. सहा महिन्यांनंतर ...
परत एक महिन्या नंतर 'भारत संरक्षण कायद्या' खाली त्यांना येरवड्याच्या तुरूंगात डांबण्यात ...
५ साली यशवंतरावांना मुक्त करण्यात आले.[१०]

रोप

ंतराव चव्हाण हे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व आहे विद्यार्थी दशेतच स्वांतत्र्य चळवळीत ...
ंनी स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही राज्याच्याच नव्हेतर देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले ...
ा लढ्यात प्रमुख नेतेमंडळीना इंग्रजानी अटक केली व त्यानंतर दुसऱ्या फळीला स्वातंत्र्य लढ्यात नेतृत्व ...
ली या लढ्यात यशवंतरावानी केलेले कार्य खरोखरच अतुलनीय आहे. काँग्रेसच्या वतीने मुंबई ...
ाच्या निवडणुकीत उमेदवारी मिळाली. व त्यांच्या चळवळीच्या कार्याचे फलीत म्हणून ते ...
वंतरावांचे व्यक्तीमत्त्व असामान्य व्यक्तीमत्त्वाच्या दिशेने जाताना त्यांच्या कार्यातील महत्त्वाचा ...
४२ चा लढा म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

:-


जनी पाम,(अनु) य.ना.देवधर, आजकालचा भारत, डायमंड प्रकाशन, २००६, पृ.५७३.
पीन, (अनु) डॉ.एम.व्ही.काळे, मॉर्डन इंडिया, के. सागर प्रकाशन, २०१०, पृ.३२८,३२९.
मुख शिवाजीराव, शैलीकार यशवंतराव, कौसल्य प्रकाशन, २००९, पृ.९२.
रोजिनी(संपा), मी पाहिलेले यशवंतराव, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्र...
पृ.५६, ५७.
यशवंतराव, यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र, खंड १, प्रेस्टीज प्रकाशन, १९८७, पृ. २५२, ...
मुख शिवाजीराव, उपरोक्त, पृ.९३.
यशवंतराव, उपरोक्त; पान नं.२५४.
पान नं.२५६ व २५७.
पान नं.२६७.
विश्वास, महाराष्ट्रभूषण यशवंतराव चव्हाण, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री गंधर्व प्र...
पृ. ७८.




# १२. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय नेतृत्त्वाचा उदय


प्रा.डॉ.सुमित संभाजी यादव
वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराड


**प्रस्तावना:**

महात्मा गांधीजींच्या कुशल नेतृत्त्वामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली होती. त्यामुळे ग्रामीण भागातून असंख्य कार्यकर्ते उदयाला येऊ लागले होते. त्यांनी भारताच्या जडणघडणीमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्त्वाचे आगळेवेगळे असे स्थान आहे. यशवंतरावांच्या नेतृत्त्वात अनुवांशिकतेचा भाग जवळपास नव्हताच, नेतृत्त्व निर्माण होण्यासाठी लागणारे कौटुंबिक वातावरण, पैसा, प्रतिष्ठा, परंपरा वगैरे पोषक ठरणाऱ्या गोष्टी यशवंतरावांच्या वाट्यास आलेल्या नव्हत्या. तरीही त्यांनी सवंग लोकप्रियतेचा हव्यास व नेतृत्त्वाचे लघुरस्ते शोधण्याचा आटापिटा कधीच केला नाही. बहुजन समाजातील सर्वसामान्य वर्गातून येवून त्यांनी देशाच्या राजकारणात मौलिक योगदान दिलेले आहे. यशवंतरावांच्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकीय नेतृत्त्वाच्या उदयाचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आलेला आहे.

**यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीकडे :**

यशवंतराव चव्हाणांचा जन्म १२ मार्च, १९१३ राजी देवराष्ट्रे, ता. खानापूर या त्यांच्या आजोळी झाला. ते चार वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यु झाला. त्यामुळे नंतर आई व गणपतराव यांच्या समवेत ते कराडला स्थायिक झाले. तेथेच त्यांचे बालपण व शिक्षण झाले. शाळेत असताना हुशार व वक्तृत्वात निपुण विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांना वाचनाची गोडी लागलेली होती. कराडचे जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते गणपतराव बटाणे यांच्या गुळाच्या वखारीत त्यांची उठबस असे. तेथे काशीनाथ देशमुख, नाना पाटील वगैरेंशी चर्चा होई. तसेच वडीलबंधू गणपतराव हे सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते होते. त्यामुळे घरातूनच त्यांना सामाजिक जाणीवांची समज मिळत होती. यातूनच त्यांची वैचारिक बैठक आकार घेवू लागली. तरूण यशवंतरावांना सत्यशोधकांचा ब्राह्मणद्वेष पसंत नव्हता. स्वातंत्र्याचा शोध हाच खरा सत्याचा शोध आहे अशीच त्यांची ठाम विचारधारा बनत चालली होती.[१] १९३० च्या दरम्यान काँग्रेसप्रणित सविनय कायदेभंग आंदोलनात महत्मा गांधींच्या सर्वस्पर्शी नेतृत्त्वामुळे यशवंतरावही लढ्याकडे खेचले गेले. आंदोलन सुरू झाल्यानंतर राष्ट्रीय वृत्तीने भारावलेल्या यशवंतरावांनी काही मित्रांसह आपल्या टिळक हायस्कूलच्या आवारातील लिंबाच्या झाडावर राष्ट्रीय ध्वज फडकावून त्याला मानवंदना दिली. ही बातमी समजताच शाळेच्या अधिकाऱ्यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले व असे करण्याचे कारण विचारले. तेव्हा त्यांनी स्वयंस्फूर्तीने केले असे बाणेदार उत्तर दिले. तेंव्हा शाळेच्या प्रशासनाने शाळकरी मुलांचा खेळ म्हणून याकडे दुर्लक्ष केले. नंतर यशवंतरावांनी सहकाऱ्यांच्या मदतीने कराड म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय ध्वज फडकावून शहरात चळवळींची पत्रके चिकटविली. त्यांच्या या कार्यामुळे ब्रिटीश सरकारने त्यांना अटक केली. दीड वर्षांची शिक्षा देवून त्यांची रवानगी येरवड्याच्या कारागृहात करण्यात आली. या काळात विपुल वाचन व इतर राजकीय कैद्यांशी चर्चा यातून

त्यांच्या ज्ञानात प्रचंड भर पडली. जेलमध्येच त्यांनी १९२१-२२ च्या असहकार आंदोलनातील हजारो विद्या... शिक्षण अपुरे न सोडता स्वातंत्र्य चळवळीतील कार्याबरोबरच आपले शिक्षण पूर्ण करून वकील बनण्याचे ... केले.'

**नाईट स्कूल :**

जेलमधून सुटल्यानंतर यशवंतरावांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण करण्यावर आपले लक्ष्य केंद्रीत केले. ... त्यांनी समविचारी मित्र परिवार वाढवून कराडातील एक प्रभावशाली तरूण कार्यकर्ता म्हणूनही ... मिळविला होता. त्यांनी हरिजन मुलांच्या शिक्षणासाठी कराडमधील बुधवार पेठेतील महारवाड्यात नाईट ... करण्याचे ठरविले. त्यासाठी यशवंतरावांनी पुण्याला जावून महर्षी वि. रा. शिंदेंची भेट घेवून त्यांना ... उद्घाटन करण्यासाठी बोलविले. या शाळेच्या उद्घटनाप्रसंगी यशवंतरावांनी स्वतःच्याच घरी महर्षी ... हरिजनांच्या पंगती घडवून आणल्या.' या शाळेत दोन ते तीन वर्षे त्यांनी शिक्षक म्हणूनही काम पाहिले. ... यशवंतरावांच्या सामाजिक पैलूसह उदयाला येणाऱ्या नेतृत्वाची झलक दिसते.

**१९३७ सालच्या सार्वत्रिक निवडणुका :**

फेब्रुवारी १९३७ मध्ये प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर झालेल्या होत्या. या निवडणुकीत ... सातार्यातून बहुजन समाजाचे उमेदवार म्हणून आत्मारामबापू पाटील यांना उमेदवारी मिळावी म्हणून जिल्हा ... कमिटीच्या विरोधात जावून यशवंतराव चव्हाण व नाना पाटील यांनी प्रयत्न केले. यशवंतरावांनी मुंबईला ... सरदार पटेलांची भेट घेवून आपले म्हणणे त्यांना पटवून दिले व उमेदवाराच्या विजयाची हमीही घेतली. ... आत्मारामबापूंना सातार्यातून तिकीट मिळाले. यशवंतराव, नाना पाटील व सर्व कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ... येवून आत्मारामबापू हे संपूर्ण मुंबई इलाख्यात पहिल्या क्रमांकाची ३७,१२० मते पडून प्रचंड मताधिक्क्याने निवडून ... आले.' स्थानिक नेतृत्वाच्या विरोधात जावून जनतेच्या खऱ्या मनस्थितीची जाणीव वरिष्ठ नेत्यांना करून देण्यात ... स्थानिकांच्या चुकीच्या निर्णयामुळे होणारे पक्षाचे नुकसान टाळून लोकांची मने जिंकण्याचे तंत्र यशवंतरावांनी ... कमालीचे यशस्वी करून दाखविले. हे धोरण म्हणजे यशवंतरावांच्या पुढील राजकारणातील यशस्वीतेची गुरुकिल्ली ... मानावी लागेल.

**तासगांव परिषद :**

सन १९३७ च्या दरम्यान मानवेंन्द्रनाथ रॉयच्या समाजवादी विचारांकडे यशवंतराव चव्हाण आकर्षिले गेले. ... कॉंग्रेसअंतर्गत असणाऱ्या कॉंग्रेस समाजवादी पक्षातर्फे रॉयना गांधीचे पर्यायी नेतृत्व म्हणून राष्ट्रीय पातळीवर ... आणले जात होते. सातार्यात यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आत्माराम बापू पाटील, ... महाजनी, भय्याशास्त्री वाटवे इ. जिल्ह्यातील रॉयवादी मंडळींनी समाजवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी 'लोकशक्ती' ... हे साप्ताहिक सुरू केले होते.' त्यावेळची सातारा जिल्ह्याची राजकीय परिषद तासगांवला घेण्याचे ठरले. ... गांधीजींच्या नेतृत्वाला पर्यायी नेतृत्व देण्याच्या कल्पनेच्या मंडळींनी मानवेंन्द्रनाथांना परिषदेचे अध्यक्ष म्हणून ... बोलाविले होते. तसेच पर्यायी नेतृत्वाचा ठरावही या सभेत संमत करण्याचा रॉयवादी मंडळींचा मानस होता. ... गोष्टीला जिल्ह्याचे प्रमुख नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांचा विरोध होता. तर यशवंतराव चव्हाणही या पर्यायी ... नेतृत्वाच्या कल्पनेबद्दल सांशक होते. तरीही इतर रॉयवादी मंडळींनी ही परिषद यशस्वी करण्याचा निर्धार केलेला ... होता. त्यामुळे ही परिषद अतिशय वादळी होण्याचे संकेत अगोदरच मिळालेले होते. जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण ... महाराष्ट्राचे लक्ष या परिषदेकडे लागलेले होते. परिषदेत इतर ठराव मांडून पासही केले जात होते. परंतु जेव्हा ...

त्यांच्या ज्ञानात प्रचंड भर पडली. जेलमध्येच त्यांनी १९२१-२२ च्या असहकार आंदोलनातील हजारो विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षण अपुरे न सोडता स्वातंत्र्य चळवळीतील कार्याबरोबरच आपले शिक्षण पूर्ण करून वकील बनण्याचे ध्येय मनाशी केले.[२]

**नाईट स्कूल :**

जेलमधून सुटल्यानंतर यशवंतरावांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण करण्यावर आपले लक्ष्य केंद्रीत केले. त्याचबरोबर त्यांनी समविचारी मित्र परिवार वाढवून कराडातील एक प्रभावशाली तरूण कार्यकर्ता म्हणूनही नावलौकिक मिळविला होता. त्यांनी हरिजन मुलांच्या शिक्षणासाठी कराडमधील बुधवार पेठेतील महारवाड्यात नाईट स्कूल सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी यशवंतरावांनी पुण्याला जावून महर्षी वि. रा. शिंदेची भेट घेवून त्यांना या शाळेचे उद्घाटन करण्यासाठी बोलविले. या शाळेच्या उद्घटनाप्रसंगी यशवंतरावांनी स्वतःच्याच घरी महर्षी शिंदेंना हरिजनांच्या पंगती घडवून आणल्या.[३] या शाळेत दोन ते तीन वर्षे त्यांनी शिक्षक म्हणूनही काम पाहिले. या घटनेत यशवंतरावांच्या सामाजिक पैलूसह उदयाला येणाऱ्या नेतृत्वाची झलक दिसते.

**१९३७ सालच्या सार्वत्रिक निवडणुका :**

फेब्रुवारी १९३७ मध्ये प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर झालेल्या होत्या. या निवडणुकीत दक्षिण साताऱ्यातून बहुजन समाजाचे उमेदवार म्हणून आत्मारामबापू पाटील यांना उमेदवारी मिळावी म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीच्या विरोधात जावून यशवंतराव चव्हाण व नाना पाटील यांनी प्रयत्न केले. यशवंतरावांनी मुंबईला जाऊन सरदार पटेलांची भेट घेवून आपले म्हणणे त्यांना पटवून दिले व उमेदवाराच्या विजयाची हमीही घेतली. शेवटी आत्मारामबापूंना साताऱ्यातून तिकीट मिळाले. यशवंतराव, नाना पाटील व सर्व कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांना यश येवून आत्मारामबापू हे संपूर्ण मुंबई इलाख्यात पहिल्या क्रमांकाची ३७,१२० मते पडून प्रचंड मताधिक्क्याने निवडून आले.[४] स्थानिक नेतृत्त्वाच्या विरोधात जावून जनतेच्या खऱ्या मनस्थितीची जाणीव वरिष्ठ नेत्यांना करून देणे आणि स्थानिकांच्या चुकीच्या निर्णयामुळे होणारे पक्षाचे नुकसान टाळून लोकांची मने जिंकण्याचे तंत्र यशवंतरावांनी कमालीचे यशस्वी करून दाखविले. हे धोरण म्हणजे यशवंतरावांच्या पुढील राजकारणातील यशस्वीतेची गुरूकिल्ली मानावी लागेल.

**तासगांव परिषद :**

सन १९३७ च्या दरम्यान मानवेंन्द्रनाथ रॉयच्या समाजवादी विचारांकडे यशवंतराव चव्हाण आकर्षिले गेले होते. काँग्रेसअंतर्गत असणाऱ्या काँग्रेस समाजवादी पक्षातर्फे रॉयना गांधीचे पर्यायी नेतृत्त्व म्हणून राष्ट्रीय पातळीवर पुढे आणले जात होते. साताऱ्यात यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आत्माराम बापू पाटील, ह.रा. महाजनी, भय्याशास्त्री वाटवे इ. जिल्ह्यातील रॉयवादी मंडळींनी समाजवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी 'लोकक्रांती' हे साप्ताहिक सुरू केले होते.[५] त्यावेळची सातारा जिल्ह्याची राजकीय परिषद तासगांवला घेण्याचे ठरले होते. गांधीजींच्या नेतृत्त्वाला पर्यायी नेतृत्त्व देण्याच्या कल्पनेच्या मंडळींनी मानवेंद्रनाथांना परिषदेचे अध्यक्ष म्हणून बोलाविले होते. तसेच पर्यायी नेतृत्त्वाचा ठरावही या सभेत संमत करण्याचा रॉयवादी मंडळींचा मानस होता. या गोष्टीला जिल्ह्याचे प्रमुख नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांचा विरोध होता. तर यशवंतराव चव्हाणही या पर्यायी नेतृत्त्वाच्या कल्पनेबद्दल सांशक होते. तरीही इतर रॉयवादी मंडळींनी ही परिषद यशस्वी करण्याचा निर्धार केलेला होता. त्यामुळे ही परिषद अतिशय वादळी होण्याचे संकेत अगोदरच मिळालेले होते. जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या परिषदेकडे लागलेले होते. परिषदेत इतर ठराव मांडून पासही केले जात होते. परंतु जेव्हा

संयोजकांनी पर्यायी नेतृत्त्वासंबंधीचा ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नाना पाटलांनी महात्मा गांधींचा जयजयकार करून सहकाऱ्यांसह बळाचा वापर करून ही परिषदच उधळून लावली. रॉयवादी गट पुरता नामोहरम झाला. या घटनेमुळे संपूर्ण जिल्हा गांधींच्या मागे उभा असल्याचा संदेश जनतेपर्यंत गेला. या परिषदेतील रॉयवादी मंडळींची हटवादी भूमिका पाहिल्यामुळे यशवंतरावांनी चिंतन करून पुन्हा गांधींच्या नेतृत्त्वाखालील गटात येण्याचा निर्णय घेतला. नाना पाटलांच्या कृतीला पक्ष नेतृत्त्वाचे असलेले पाठबळ पाहून त्यांनी पुन्हा कधीही नेतृत्त्वाविरोधात न जाण्याचे ठरविले.[६] जनतेच्या न्याय मागण्यांना पक्षांतर्गत राहूनच वाचा फोडण्याचे मनोमन निश्चित केले. ही तासगाव परिषद त्यांच्या राजकीय नेतृत्त्वाच्या उभारणीत महत्त्वपुर्ण अशी घटना आहे. यानंतर थोड्याच काळात कराड म्युनिसिपलच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यांचे बंधू गणपतराव हे काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात उभे होते. तेव्हा यशवंतरावंनी बंधूच्या विरोधात प्रचार करून त्यांचा पराभव घडवून आणला. नंतर ते काही काळ सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षही झाले. पुढील काळात अगदी कठीण प्रसंगीही ते वरिष्ठ नेतृत्त्वाबरोबरच राहिले. प्रसंगी जनतेचा रोषही पत्करला. नंतर त्यांनी आपले वकिलीचे शिक्षण पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रीत केले. त्यामुळे ते वैयक्तिक सत्याग्रह चळवळीपासून दूर होते. तरीही जिल्ह्यातील घडामोडींवर त्यांचे बारकाईने लक्ष होते. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पुन्हा राजकारणात लक्ष घालण्यास सुरूवात केली. शिक्षणामुळे त्यांच्या जिल्ह्यातील राजकीय वजनात भर पडली होती. १९४२ च्या मार्च महिन्यात कोल्हापूर संस्थानातील अर्जुनवाड येथे त्यांनी दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी दुष्काळी परिषद आयोजित केली होती.

**सातारा प्रतिसरकार आणि यशवंतराव:**

ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबई येथील गोवालिया टँक मैदानावरील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी 'करेंगे या मरेंगे' हा संदेश देवून अखेरच्या लढ्याचे रणशिंग फुंकले. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण जातीने हजर होते. 'तुम्ही आजपासून स्वतंत्र झाला आहात असे समजून वागा' या गांधीजींच्या उद्गाराने ते भारावून गेले होते. ब्रिटीश सरकारने हे आंदोलन दडपण्यासाठी बळाचा वापर सुरू करून सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली. त्यावेळी यशवंतरावांनी भूमिगत राहून कार्य करण्याचे ठरविले. ब्रिटीश सरकारचा निषेध करण्यासाठी शांततामय मोर्चे काढण्याचे ठरविले गेले. कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर इ. ठिकाणी मामलेदार कचेरीवर शांततामय मोर्चे काढले गेले. यामध्ये यशवंतरावांनी प्रत्यक्ष सहभाग न घेता त्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर राहून मोर्चाचे नियोजन व त्याला मार्गदर्शन केले. वडूज व इस्लामपूर मोर्चावरील गोळीबारानंतर साताऱ्यातील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी कुंडलला जिल्ह्यातील प्रमुख कार्यकार्त्यांची बैठक झाली. बैठकीत भूमिगत आंदोलन करण्याचे ठरविले गेले. नाना पाटलांकडे लढ्याचे नेतृत्त्व दिले गेले तर आंदोलनात सुसुत्रता राखून समन्वय राखण्यासाठी यशवंतराव चव्हाणांची डिक्टेटर म्हणून नेमणुक करण्यात आली. जिल्ह्यातील आंदोलनाने चांगलाच जोर पकडल्यामुळे ते दडपून टाकण्यासाठी ब्रिटीश सरकारने यशवंतराव चव्हाण, नाना पाटील आदी प्रमुख नेत्यांच्या अटकेसाठी बक्षिसे लावली.[७] लढ्याच्या अंतिम यशासाठी क्रांतिसिंह नाना पाटलांची सुरक्षितता फार महत्त्वाची असल्यामुळे यशवंतराव चव्हाणांनी ५ नोव्हें. १९४२ ला कुंभारगावातील अप्पा मास्तरांच्या मळ्यात प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या गुप्त बैठकीत नाना पाटलांच्या सुरक्षिततेची काळजी अग्रक्रमाने घेवून लढा अधिक निर्धाराने व सतर्कतेने चालू ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. मे १९४३ मध्ये आपल्या आजारी पत्नीला फलटण येथे भेटायला गेले असताना यशवंतराव चव्हाणांना अटक झाली. त्यानंतरही जिल्ह्यातील आंदोलन ठामपणे सुरूच होते. अल्पावधीत १ जून १९४३ ला कामेरी येथे नाना पाटलांच्या नेतृत्त्वाखाली सातारा प्रतिसरकारची स्थापना झाली.[८] या बैठकीत शांताराम

इनामदार यांनी दोन निरोप सांगून सर्वांनाच गोंधळात टाकले. यातील पहिला निरोप 'सरकारपुढे हजर ... अर्थाचा अच्युतराव पटवर्धनांचा होता. तर दुसरा निरोप 'लढा थांबवून सर्वांनी पोलीसात हजर व्हावे' ... यशवंतरावांचा होता. सर्व भूमिगतांतील संभ्रम दूर करण्यासाठी नाना पाटलांनी अच्युतरावांकडे बर्डे ... काकांना पाठवून सत्यता जाणण्याचे ठरविले. तर यशवंतराव जेलमध्ये असल्यामुळे त्याचे स्पष्टीकरण ... प्रश्नच आला नाही. पुढे अच्युतरावांनी आपण असा काही संदेश दिला नसल्याचे कळविले. ... निरोपांची सत्यता न पाहताच शांताराम इनामदार, के. डी. पाटील, भिकूनाना साळुंखे आदी मंडळी ... झाली. पुढील काळात यशवंतरावांनी जेलमधून सुटल्यावर आपण कसलाच निरोप पाठविला नसल्याचे ... या गोष्टीवरून असे दिसून येते की, आंदोलनाच्या यशस्वीतेची खात्री नसणारे काही कुंपणावरील कार्यकर्ते ... आंदोलनात होते. त्यांना यातून बाहेर पडण्यासाठी काहीतरी कारण हवे होते. म्हणून त्यांनी यशवंतरावांच्या ... निरोपाची अफवा पसरवली असण्याची शक्यता आहे. जोमात सुरू असणाऱ्या आंदोलनाचे खच्चीकरण ... यशवंतराव चव्हाणांसारखी जबाबदारी व्यक्ती पाठवेल या संदर्भात नाना पाटीलही साशंक होते. ... उठलेल्या वादंगामुळे तुरूंगातून सुटल्यानंतर यशवंतरावांनी भूमिगत आंदोलनाशी संबंध ठेवला नाही. ... वकिलीचा व्यवसाय करू लागले. इतिहासात सोनेरी अक्षरांनी लिहिल्या गेलेल्या प्रतिसरकारच्या लढ्याची ... करण्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावून कार्य केले होते. परंतु प्रतिसरकारची स्थापना व वाटचाल यामध्ये ... प्रत्यक्ष असा सहभाग नव्हता. मात्र त्याविषयी त्यांना आपुलकी होती.

**१९४६ ची निवडणुक व यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय नेतृत्त्वाची पायाभरणी:**

ब्रिटिश सरकारने देशाला स्वातंत्र्य देण्याआगोदर सत्ता सोपविण्यासाठी असेंब्लीच्या निवडणुका मार्च १९४६ ... होतील असे जाहीर केले होते. या निवडणुकांपूर्वी देशातील सर्व भूमिगतांची वॉरंटे रद्द करून तुरूंगातील राजकैद्यांची मुक्तता केली. परंतू इतर भागाप्रमाणे साताऱ्यातील भूमिगतांची वॉरंटे रद्द केली नव्हती. १९४२ च्या ... लढ्यानंतर होणाऱ्या या पहिल्या निवडणुकीमध्ये यशाची हमखास खात्री होती. या निवडणुकीत काँग्रेसचे ... साताऱ्यातील उमेदवार ठरविण्यासाठी स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली वाळवे येथे बैठक झाली. ... या बैठकीला यशवंतराव चव्हाण हजर नव्हते. कारण त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले होते की, १९३७ आणि ... साल यामध्ये फार मोठा फरक झालेला आहे. या काळात एक मोठे जनआंदोलन व जागतिक युद्ध होवून गेलेले ... त्यामुळे उमेदवारांची निवड ही सर्वांच्या विचाराने दर्जेदारपणे व पारदर्शकपणे व्हायला हवी. पण आमचे प्रतिसरकार ... लढ्यातील अनेक साथीदार अजूनही भूमिगत आहेत तर काही जेलमध्ये आहेत. त्यामुळे याला उमेदवारी ... याला देवू नका अशा तऱ्हेच्या चर्चेत निदान मी तरी पडणार नाही. अखेर यशवंतराव चव्हाण व क्रांतिसिंह ... पाटील अशा जिल्ह्यातील दोन दिग्गज नेत्यांच्या अनुपस्थितीत सर्वानुमते दक्षिण साताऱ्यासाठी यशवंतराव ... व्यंकटराव पवार, के. डी. पाटील व बाबुराव गोखले यांना काँग्रेसची उमेदवारी देण्याचे ठरविले गेले. नंतर ... या उमेदवारांचा एकदिलाने प्रचार केला.[१०] या निवडणुकीत मुंबई प्रांतात काँग्रेसने दैदिप्यमान यश संपादन ... सातारा जिल्ह्यातून सर्वच्या सर्व आठही उमेदवार जनतेने प्रचंड मतांनी निवडून दिले. जिल्ह्याने १९४२ च्या ... निर्माण केलेल्या गौरवशाली प्रतिसरकारचे प्रतिनिधीत्व ते मुंबई प्रांतात करणार होते. यशवंतरावांची मोरारजी ... यांच्या गृहखात्याचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या भावी राजकारणातील कारकिर्दीच्या दृष्टीने त्यांचे व मोरारजी देसाई यांचे या टप्प्यावरील साहचर्य फारच परिणामकारक ठरले. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य व प्रतिसरकारची पुण्याई यांच्या जोरावर त्यांच्या नेतृत्त्वाची पायाभरणी झाली होती. यशवंतराव



यानंतर मागे वळून पाहिले नाही. पक्षनिष्ठा जपून आपल्या अंगभूत गुणदोषांच्या आधारे त्यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल भारतीय राजकारणावरही आपल्या नेतृत्त्वाचा ठसा उमटवला.

**समारोप :**

स्वातंत्र्यपूर्वकाळात यशवंतराव चव्हाण यांची अभ्यासपूर्ण व व्यासंगी नेता अशी ओळख होती. संवेदनक्षम मन आणि मनमिळाऊ स्वभाव या दोन गोष्टींचा चव्हाणांच्या नेतृत्त्व उभारणीत फार मोठा वाटा आहे. त्यांचा मूळ पिंड आंदोलनात उडी टाकून पुरूषार्थ करण्याच्या कधीच नव्हता किंबहुना तो काहीसा चिंतनशील व एकांतप्रिय असाच होता. राजकारण करताना भावनावेगापेक्षा बौद्धिक प्रेरणेलाच त्यांनी महत्त्व दिले. भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ भान आणि ती बदलण्याची जिद्द त्यामागे होती. ते समोरील परिस्थिती नीट पारखून घेत. परिस्थितीशी कधी जुळते घेवून, तर कधी माफक संघर्ष करून नेतृत्त्वाची एकेक पायरी चढण्याचे तंत्र त्यांनी अवगत करून घेतले होते. त्यामुळे ते अन्य समकालीन बहुजन समाजातील नेत्यांपेक्षा अधिक व्यापक अर्थाने व दीर्घकाळ नेतृत्त्व गाजवू शकले. यालाच स्वातंत्र्योत्तर काळात बेरजेचे राजकारण म्हणून ओळखले जावू लागले. त्यांच्या राजकीय नेतृत्त्वाच्या उदयात स्वातंत्र्यपूर्वकाळातील घटनांचा फार मोठा वाटा आहे.

**संदर्भ :**


१. भोळे भास्कर लक्ष्मण, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ. २ ते ५.
२. चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, १० एप्रिल, १९८६, पृ. – ४१ ते ४४.
३. बाबर कृ. भा., यशवंतराव चव्हाण व्यक्ती व कार्य, ठोकळ प्रकाशन पुणे, २७ एप्रिल, १९६०, पृ. १३.
४. पाटील रा. तु., यशवंतराव चव्हाणः एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, राजे-देसाई प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, ५ मे १९८६, पृ.१९.
५. शिवणीकर राघव, साताराचा सिंह : क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, एस्. एम्. अधाटे पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट १९८६, पृ. ४७.
६. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठः यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र, खंड पहिला, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ७ फेब्रु., १९८४, पृ. १९५.
७. मुंबई पुराभिलेखागार विभाग, महाराष्ट्र राज्य, होम डिपार्टमेंट (स्पे.) फाईल नं. १११०(४८) ए(२)- १९४२-४३, पृ. १३.
८. साप्ताहिक नवयुग, सातारा प्रतिसरकार विशेषांक, दि. १२ मे १९४६, पृ. १७.
९. डॉ. शिंदे आबासाहेब, साताराचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००३, पृ.१८७, १८८.
१०. चव्हाण यशवंतराव, कृष्णाङ्कङ्काठ : यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र; उपरोक्त, पृ.२९०.